नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/01/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 5 कि.मी अंतरावर वारेगाव रेतीघाट येथे दिनांक 31/12/2020 चे 06.00 वा. ते 06.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमित गुलाबराव हाडके(जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर), वय 39 वर्ष हे त्यांच्या पथकासह मौजा वारेगाव येथील सर्वे क्र 16 येथे असलेला अवैधरित्या रेती साठा तपासणी करीता आले असता त्यांना वारेगाव रेतीघाट ते वारेगाव गावाकडे रोड वरती ट्रक क्र एमएच–40/एन–7806 हा दिसुन आला. फिर्यादीने ट्रकची तपासणी केली तेव्हा त्यामध्ये 5 ब्रास रेती किं 3,95,00/– रू चा मुद्देमाल मिळुन आला. तसेच ट्रक चालकास परवाना विचारले असता नसल्याचे सांगीतल्याने. त्यामुळे ट्रक चालक आरोपीला ट्रक बाजुला लावण्यास सांगुन पुढील कार्यवाही करीता फिर्यादी पथकासह वारेगाव रेती घाट या ठिकाणी गेले असता त्या रेती घाटात ट्रक क्र एमएच–40 एके–0695 चा चालक आरोपी हा त्याच्या ट्रक मधील चोरलेली रेती बाजुला टाकुन तो आपला रेतीचा ट्रक जागेवर सोडून पळुन गेला. त्यामुळे पथकाने त्या ठिकाणचे जप्ती पंचनामा तयार करून सदर ट्रकवर चिपकवला त्या वेळी काही वेळानंतर दोन्ही ट्रक हे घटनास्थळ वरून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री प्रितम निमगडे पो स्टे खापरखेडा मो न 8999917112 हे करीत आहे.

## खून

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा सावळा चापेगडी येथे दिनांक 05/01/2021 चे 21.45 वा. दरम्यान मृतक नामे– राजकुमार रघुनाथ गेडाम, वय 47 वर्ष, रा. चापेगडी ता. कुही. जि. नागपूर हा नेहमी दारू पिण्याच्या सवयीचा होता. तो नेहमी दारू पिऊन घरच्या लोकांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करून त्रास देत असल्याने त्याचे त्रासाला कंटाळुन मृतकाचा लहान मुलगा विधिसंघर्षग्रस्त याने "याचे नेहमीचेच आहे" असे म्हणुन रागाचे भरात कुऱ्हाडीच्या धारदार पात्याचे उलट बाजूने राजकुमार गेडाम याचे डोक्यावर वार करून त्याला जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा अरूण कावळे पो. स्टे. कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि कमलेश सोनटक्के मो. क्र. 9422644538 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर